# प्रेसनोट

दि. ०६/०३/२०२४

**वस्तु व सेवा कर कार्यालय, येरवडा पुणे येथील राज्यकर अधिका-यावर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ३२ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्रीमती. मालती रमेश कठाळे, वय ४३ वर्ष, पद - राज्यकर अधिकारी, वस्तु व सेवाकर विभाग, येरवडा, पुणे (वर्ग-२) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३,०००/- रुपये |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ३,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ३,०००/- रुपये (तीन हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | ०६/०३/२०२४ |
| सापळा दिनांक | ०६/०३/२०२४ |

ठिकाण :- , वस्तु व सेवाकर कार्यालय, (GST) येरवडा, पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी त्यांच्या पत्नीच्या नावाने नवीन जी.एस.टी. नंबर घेण्यासाठी वस्तु व सेवाकर विभागास ऑनलाईन अर्ज केला असून, त्यासाठी २५००/- रुपये भरले होते. सदरचे प्रकरण लोकसेविका श्रीमती. मालती कठाळे यांचेकडे प्रलंबित होते. लोकसेविका श्रीमती. मालती कठाळे यांनी तक्रारदार याना समक्ष बोलवून नवीन जी.एस.टी. नंबर मंजुर करून देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे ३०००/- रुपयाची लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, लोकसेविका मालती कठाळे यांनी तक्रारदार यांचेकडे नवीन जीएसटी नंबर देण्यासाठी ३०००/- रुपये लाच रक्कमेची मागणी करुन, लोकसेविका मालती कठाळे यानी तक्रारदार यांचेकडून रक्कम रुपये ३,०००/- (तीन हजार रुपये) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यावर त्याना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे वरील प्रमाणे गुन्हा नोंद करण्याची करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.